# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २७/०८/२०२४ (मंगळवार) सकाळ**

---

### घरफोडी गुन्हयातील अट्टल गुन्हेगार स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळयात

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.) यांनी पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा यांच्या नेतृत्वात सदर गुन्हयाचे समांतर तपास करण्याचे आदेश दिले. त्यावरून पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा यांनी आपल्या अधिपत्याखाली अधिकारी व अंमलदार यांचे वेगवेगळे पथके तयार करून तपासाच्या सुचना दिल्या. दिनांक २६/०८/२०२४ रोजी पोलीस स्टेशन सावनेर अप. क्र. ७२१/२०२४ कलम ३३१(३), ३०५ (A) BNS तसेच सावनेर, कळमेश्वर, केळवद येथील इतर घरफोडी गुन्हयाचे समांतर तपास व आरोपीचा शोध स्थानिक गुन्हे शाखा करीत असताना गोपनीय बातमीदारा कडून मिळालेल्या माहिती वरून व तांत्रिक माहिती वरून  पोस्टे सावनेर व कळमेश्वर घरफोडी गुन्हयात **आरोपी क्रं. १) पाहिजे आरोपी कार्तिक सूरजभान बालगुहे रा. चंद्रमणी नगर, अजनी नागपूर व २) राकेश/कालु कमलकिशोर यादव वय २३ वर्ष रा शेषनगर हुडकेश्वर, पिपला नागपूर** यांनी केले असल्याची खात्रीशीर माहिती प्राप्त झाल्याने आरोपींचा शोध घेतला असता आरोपी क. २ मिळून आल्याने आरोपीने त्याचा वर्ग मित्र आरोपी क्रं १ कार्तिक असे दोघांनाही गांजा पिण्याचा शोक असल्याने त्यांनी घरफोडी केल्याचे कबुली देऊन गून्हयातील चोरलेले सोन्याचे दागिने त्यांचे ओळखीचा सोनार आरोपी ३) चंद्रकांत सुभाष पोगले वय ४३ वर्ष रा. सुभेदार ले आऊट सक्करदरा नागपूर यास विकले व चोरीचे नगदी रुपये नशा पाण्यात खर्च केल्याचे सांगितले आरोपी क्रं ३ यास ताब्यात घेउन त्याचे जवळून गुन्हयातील १) सोन्याचे लगड वजन अंदाजे १५ ग्रा. किंमती रू. १,००,०००/—रू. २) सोन्याचे लगड वजन अं. १० ग्रा. की रू. ७०,०००/—रू. ३) एक नथ वजन अंदाजे १.५ ग्रा किंमती रू. १०,०००/—रू. ४) दोन मोबाईल अं किंमती २०,०००/—रू. तसेच आरोपी क्रं ३ ने पत्नीचे नावाने इंडेल मनी बँकेत गहाण ठेवलेले गुन्ह्यातील चोरीचे सोन्याचे दागिने १) सोन्याचे मंगळसूत्र २४.१ ग्राम व २) कानातील टॉप्स, नथ वजनी ५.७ ग्रॅम एकूण २९.८ ग्राम अंदाजे किंमती २,६५,०००/— रुपये असा एकूण ४,६५,०००/— रू मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जप्त मुद्देमालासह आरोपी गुन्याचे पुढील तपास कामी पोलीस स्टेशन सावनेर चे ताब्यात देण्यात आले.

**उघड गुन्हे—**

१) पो. स्टे. सावनेर अप क्र ७२१/२०२४ कलम ३३१(३), ३०५ (A) BNS

२) पो. स्टे. सावनेर अप क्र. ६९९/२४ कलम ३३१(३), ३०५BNS

३) पो. स्टे. कळमेश्वर अप. क्र. ६२३/२०२४ कलम ३३१(३), ३०५ (A) BNS

४) पो. स्टे. कळमेश्वर अप क्र ६२४/२०२४ कलम ३३१(३), ३०५ (A) BNS

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, सपोनी. किशोर शेरकी, आशिषसिंह ठाकूर, सपोनी लेगांडे अंगुली मुद्रा, पोहवा संजय बांते, राजू रेवतकर, इकबाल शेख, दिनेश आधापुरे, पोअं धोंडूतात्या देवकत्ते, पोना सतिष राठोड सायबर सेल, चापोहवा अमोल कुथे यांनी पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर